**प्रेसनोट दि.१७/०३/२०१९**

**सिंहगडरोड पोलीस स्टेशन,पुणे शहर**

**सिंहगडरोड पो.ठाणे कार्यक्षेत्रातील सोसायटीमधील रहिवाश्यांची बैठक घेवुन पोलीसांनी केली जनजागृती**

---

दि.१७/०३/२०१९ रोजी वडगांव बुद्रुक पोलीस चौकी व न-हे पोलीस चौकी कार्यक्षेत्रातील सोसायटीमधील रहिवाश्यांची बैठक आयोजित केलेली असुन त्यावेळी सदर बैठकीत चेन चोरी संदर्भात घडणारे गुन्हे, महिलांवर होणारे अत्याचार संदर्भात घडणारे गुन्हे, सायबर क्राईम संदर्भात घडणारे गुन्हे याबाबत माहिती देवुन, महिलांनी प्रवास करताना अंगावरील परिधान केलेले दागिन्यांबाबत घ्यावयाचे सुरक्षेबाबत, कोणत्याही अनोळखी व्यक्तीस ओटीपी नंबर, बँक खाते, एटीएम कार्डचे डिटेल्स न देणेबाबत त्याअनुषंगाने घ्यावयाचे खबरदारीबाबत मार्गदर्शन केलेले आहे. तसेच कोणत्याही महिलेवर/मुलीवर कोणी इसम लैंगिक अत्याचार,विनयभंग सारखे कृत्य करीत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत पोलीसांना तात्काळ माहिती देणेबाबत तसेच पोलीस नियंत्रण कक्षाचे १०० नंबरवर माहिती देणेबाबत माहिती देण्यात आलेली आहे. त्यावेळी सोसायटींमधील २५-३० पुरुष/महिला रहिवाशी उपस्थित होते.

सदरचे बैठकीत उपस्थित रहिवाश्यांना वडगांव बुद्रुक चौकीचे प्रभारी अधिकारी सपोनि बी.डी.साळुंखे, सपोनि.एस.व्ही. उमरे, पोउनि.व्ही.जे.महांगडे तसेच न-हे पोलीस चौकी अधिकारी पोउनि. जे.सी.मोहिते, पोउनि.एस.एस. घाडगे यांनी स्वतंत्ररित्या मार्गदर्शन केलेले असुन त्याबाबत रहिवाश्यांनी समाधान व्यक्त केलेले आहे.







**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
**सिंहगडरोड पो.स्टेशन,पुणे**